# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-04.06.2026** **वार- गुरुवार**

---

**विधानपरिषद**

विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या 17 जागांसाठी तसंच एका पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस होता. अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेनंतर राज्यातल्या काही मतदारसंघांमध्ये बिनविरोध निवड निश्चित झाली आहे.

पुणे मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार श्रीकांत पाटील तसंच राष्ट्रवादी काँग्रेसचे बंडखोर उमेदवार सुनील टिंगरे आणि भाजपाचे बंडखोर उमेदवार प्रदीप कंद यांनी उमेदवारी मागे घेतल्याने महायुतीचे विक्रम काकडे यांचा मार्ग मोकळा झाला आहे.

दरम्यान विधानपरिषदेच्या निवडणुकीत महायुतीकडे संख्याबळ असून राज्यातल्या सर्व सतरा जागांवर महायुतीचा विजय निश्चित आहे, असा विश्वास भाजपा नेते आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. ते आज नागपुरात बातमीदारांशी बोलत होते.

**पर्यावरण दिन**

जागतिक पर्यावरण दिनाचं औचित्य साधून पुणे महानगरपालिका उद्यापासून "हरित पुणे, समृद्ध पुणे" हे वृक्ष लागवड अभियान सुरू करत आहे. या अभियानात सर्व नागरिक, संस्था आणि संघटनांनी उत्स्फूर्त सहभाग घ्यावा आणि पर्यावरण संवर्धनाच्या कार्यात योगदान द्यावं असं आवाहन, आयुक्त नवल किशोर राम यांनी केलं आहे. शहरातील हरित क्षेत्र वाढविणे, स्थानिक वृक्षप्रजातींचं संवर्धन करणे आणि पर्यावरणपूरक नागरी विकासाला चालना देणं हे या उपक्रमाचं उद्दिष्ट आहे. यासाठी महानगरपालिकेकडून अवघ्या 5 रुपयांत स्थानिक प्रजातींची रोपं शहरात मिळतील; अशी माहिती नवलकिशोर राम यांनी दिली आहे.

पिंपरी चिंचवड महापलिकेतही पर्यावरण दिनानिमित्त 'माझी वसुंधरा' हे अभियान राबविण्यात येत आहे. पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि हरित शहर संकल्पनेला बळ देणं हा या अभियानाचा उद्देश आहे. या अंतर्गत उद्या सकाळी 7 वाजता दुर्गा देवी टेकडी इथ वृक्षारोपण केलं जाणार आहे. या अभियानात नागरिकांनी मोठ्या संख्येनं सहभाग घ्यावा असं आवाहन महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केलं आहे.

**लष्करी अभियांत्रिकी महाविद्यालयचा दीक्षांत**

पुण्यातील लष्करी अभियांत्रिकी महाविद्यालयचा दीक्षांत समारंभ आज पार पडला. लष्करी प्रशिक्षण विभागाचे प्रमुख, लेफ्टनंट जनरल देवेंद्र शर्मा या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी 46 अधिकाऱ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. वेगाने बदलणाऱ्या तांत्रिक युगाशी सुसंगत राहण्यासाठी सातत्याने प्रयत्न करा, असं आवाहन

जनरल देवेंद्र शर्मा यांनी अधिकाऱ्यांना केलं. स्वतःमध्ये नेतृत्वगुण विकसित करून राष्ट्रासाठी निःस्वार्थ सेवा द्या असंही ते म्हणाले.

**आषाढी वारी**

आषाढी वारीसाठी संत तुकाराम महाराज पालखी सोहळा येत्या 7 जुलै रोजी देहू इथून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार असल्याची माहिती संत तुकाराम महाराज संस्थानचे पालखी सोहळा प्रमुख विक्रमसिंह महाराज मोरे यांनी काल दिली. 7 जुलै रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास देहू येथील देऊळवाड्यातून पालखी सोहळ्याचे प्रस्थान होईल. पहिल्या दिवशी पालखीचा मुक्काम देहुतील इनामदारवाडा येथे असेल. 8 जुलै रोजी पालखी आकुर्डी येथे मुक्कामी राहील. 9 जुलै रोजी पिंपरी कासारवाडी मार्गे पालखी पुण्यातील नाना पेठ येथील निवडुंगा विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दाखल होईल. येथे दोन दिवस मुक्काम असेल. 11 जुलै रोजी सोहळा हडपसरमार्गे पुढे प्रस्थान ठेवेल असं मोरे यांनी सांगितलं. आषाढी वारीसाठी लाखो वारकरी या पालखी सोहळ्यात सहभागी होणार असून प्रशासनाकडून आवश्यक नियोजन सुरू आहे.

**विषारी हातभट्टी दारू प्रकरण**

दापोडी आणि हडपसर परिसरातील विषारी हातभट्टी दारू प्रकरणात राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने कारवाई करत विषारी रासायनिक पदार्थांचा पुरवठा करणाऱ्या मुख्य दोन आरोपींना अटक केली आहे. सीआयडीच्या पुणे पथकाने नवी मुंबईतील वाशी गावातून ही कारवाई केली. अरुण चौबे आणि अभिषेक चौबे या दोघांना अटक करण्यात आली आहे. पिंपरी येथील न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये विषारी दारू प्राशन केल्याने 20 हून अधिक जणांचा मृत्यू झाला असून; या गंभीर प्रकरणात सीआयडीनं कारवाईचा वेग वाढवला आहे.

**अन्न-धाडी**

पुणे विभागात अन्न आणि औषध प्रशासन विभागाने, गेल्या 2-3 दिवसांत, भेसळीच्या संशयावरून ठिकठिकाणी छापे टाकून केलेल्या कारवाईत 31 लाख 73 हजार रुपयांचे अन्न पदार्थ जप्त केले आहेत. या कालावधीत 5 लाख 45 हजार रुपयांचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला असून 14 जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, अशी माहिती पुणे विभागाचे सह आयुक्त दि. वा. भोगावडे यांनी दिली आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल 37 तर किमान 24 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उद्याही तापमान सधारण असेच असेल आणि वीजांसह पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतसह. नमस्कार.**